श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती द्वारा संचालित

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड. जि.अमरावती.

४८

## वार्षिक अहवाल २०१८-१९

**प्रास्ताविक :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले, शिक्षण महर्षि डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांना विनम्र अभिवादन. संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष तथा उपस्थित कार्यकारीणीचे सन्माननीय पदाधिकारी यांचे हार्दीक स्वागत करतांना व महाविद्यालयाचा २०१८-१९ चा वार्षिक अहवाल महाविद्यालय विकास समिती समोर सादर करतांना मला अत्यानंद होत आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी' हा केंद्रबींदू मानून त्या विद्यार्थ्याचा सर्वागीन विकास होण्याच्या दृष्टिने विद्यार्थ्यासाठी भौतीक,शैक्षणिक, सांस्कृतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महाविद्यालय कटीबध्द आहे. त्यासाठी वर्षभर केलेल्या कार्यकतृत्वाचा लेखाजोगा आपणासमोर सादर करतो आहे.

वरिष्ठ महाविद्यालयामध्ये विज्ञान विद्याशाखामध्ये शिक्षकांची पद भरती झाल्यामुळे शिक्षकांची उणिव भरुन निघालेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्याचा आलेल्या नवीन शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे. संस्था स्तरावरुन मा.अध्यक्षांच्या मार्गदर्शनात व मा. कार्यकारीणीचे आभार व्यक्त करतो.

संशोधनाचे कार्य पूढे नेण्यासाठी मार्गदर्शकांची महाविद्यालयामध्ये मार्गदर्शक शिक्षकांची संख्या १७ वाढविण्यात आलेली असून सोबतच मान्यताप्राप्त संशोधन कार्यासाठी ०७ प्रयोगशाळेला मान्यता मिळालेली आहे. तसेच मराठी विभागा अंतर्गत मराठी प्राध्यापक परिषद व वनस्पतीशास्त्र विभागाने विद्यार्थ्यासाठी राष्ट्रीय स्पर्धा आयोजने करण्यात आले.

भौतिकस्वरुपाची गरज लक्षात घेवून महाविद्यालयाने मुलीकरिता भोजन कक्ष व कॉमन रुम,संगणकशास्त्र तथा वनस्पतीशास्त्र प्रयोगशाळेचे नुतनीकरण, पॅरापीट वॉल, वॉटर हॉर्व्हस्टींग, विज बीलापोटी होणा-या खर्चाची बचत लक्षात घेवून १० कीलो वॅट क्षमतेचे सोलर प्लॅन्ट, वाणिज्य विद्याशाखेतील शिक्षकांकरिता शिक्षक कक्ष, पाण्याचे दूर्भीक्ष लक्षात घेता नवीन विहीरीचे खोलीकरण, जीन्यावरील टॉवर, महाविद्यालयाच्या दर्शनी भागात विराजमान असलेल्या पुज्य भाऊसाहेबांच्या प्रतिमेला लागून स्टील-निशानी बसविण्यात आली.

**विद्यार्थ्याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम -**

आर ओ वॉटर प्यूरिफिकेशन प्लॉन्ट, वनस्पतीशास्त्र उद्यान, गरजू व होतकरु विद्यार्थ्यासाठी सायकल, छत्री व गणेश वितरण करण्यात आले. तसेच विवीध विभागा अंतर्गत प्रबोधनात्मक व्याख्यांनाचे आयोजन करण्यात आले तसेच व्यक्तीमत्व विकास, स्पर्धा परिक्षेसाठी मार्गदर्शनपर तज्ञ मार्गदर्शकांकडून व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

**सामाजीक गरज -**

परिसरातील शेतक-यांसाठी मार्गदर्शक प्रकल्प म्हणून गांढूळ खत निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला. विद्यार्थ्यांना याची शास्त्रशुध्द माहिती मिळावी म्हणून सदर उपक्रम राबविण्यात येतो. तसेच रोग निदान शिबीर, रक्त दान शिबीरांचे आयोजन पुज्य भाऊसाहेबांच्या जयंती नितीत्त करण्यात आले. सर्व कर्मचा-याकडून प्राप्त कॉर्पस फंडाच्या गुंतवणुकी वरिल प्राप्त व्याजाच्या रक्कमेतुन कर्मचारी तथा विद्यार्थ्याच्या कल्याणकारी योजनांची अमलबजावणी प्रभाविपणे महाविद्यालयात करण्यात येत आहे.(उदा. निरोप व सत्कार समारंभ, गरजू व होतकरु विद्यार्थ्यासाठी गणवेश, सायकल छत्री वाटप इत्यादी)

**भविष्यकालीन योजना -**

१. कला शाखेच्या जुन्या इमारतीच्या ठीकाणी प्रस्तावित नवीन इमारतीचे बांधकाम करणे.

२. दिव्यांग विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र प्रसाधन गृहाचे बांधकाम करणे.

३. ऑडीटोरीयमचे नुतनीकरण करणे.

४. पदव्युत्तर विज्ञान शाखेतील अभ्यासक्रम सुरु करणे.

५. नॅक मुल्याकंनाची कार्यवाही करणे.

वरिलप्रमाणे विवेचनाची विस्तृत माहीती पुढिलप्रमाणे आहेत.

Scanned by CamScanner

## सन २०१८- १९ मध्ये वर्गवार प्रवेशित विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे

| अ.क्र | वर्ग | सन २०१८-१९ ची विद्यार्थी संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कला | वाणिज्य | विज्ञान | एकुण |
| १ | प्रथम वर्ष | ३३५ | ३१२ | २६९ | ९१६ |
| २ | द्वितीय वर्ष | १९२ | २५१ | २३४ | ६७७ |
| ३ | तृतीय वर्ष | १९५ | २९५ | २४० | ७३० |
| ४ | एम.ए.भाग १ (अर्थशास्त्र) | ५२ | ० | ० | ५२ |
| ५ | एम.ए.भाग २ (अर्थशास्त्र) | ५० | ० | ० | ५० |
| ६ | एम.ए.भाग १ (इंग्रजी) | २२ | ० | ० | २२ |
| ७ | एम.ए.भाग २ (इंग्रजी) | १३ | ० | ० | १३ |
| ८ | एम.ए.भाग १ (मराठी) | ३९ | ० | ० | ३९ |
| ९ | एम.ए.भाग २ (मराठी) | १५ | ० | ० | १५ |
| १० | एम.कॉम भाग १ (इंग्रजी माध्यम) | ० | ९५ | ० | ९५ |
| ११ | एम.कॉम भाग २ (इंग्रजी माध्यम) | ० | ८२ | ० | ८२ |
| १२ | एम.एस्सी भाग १ (रसायनशास्त्र) | २२ | ० | ० | २२ |
| १३ | एम.एस्सी भाग २ (रसायनशास्त्र) | २१ | ० | ० | २१ |
| १४ | एम.एस्सी भाग १ (संगणकशास्त्र ) | २० | ० | ० | २० |
| १५ | एम.एस्सी भाग २ (संगणकशास्त्र) | १९ | ० | ० | १९ |
| १६ | एम.ए.भाग १ (राज्यशास्त्र) | ३२ | ० | ० | ३२ |
| १७ | एम.ए.भाग २ (राज्यशास्त्र) | २८ | ० | ० | २८ |
| | एकुण | | | | २८३३ |

शिष्यवृत्ती व सवलती : सन २०१८-१९ मध्ये विद्यार्थ्यांना मीळालेल्या विवीध प्रकारच्या शिष्यवृत्ती व सवलती धारक विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे

| अ.क्र | शिष्यवृत्ती सवलतीचे नाव | सन २०१८-१९ ची विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | भारत सरकार शिष्यवृत्ती | २१३० |
| २ | अल्पसंख्याक शिष्यवृत्ती | ३६ |
| ३ | फ्रीशीप | ४६ |
| ४ | इबीसी | ५५ |
| ५ | पीटीसी/एसटीसी | १ |
| ६ | अपंग शिष्यवृत्ती | ० |
| ७ | गुणवत्ता शिष्यवृत्ती | ० |
| | एकुण | २२६८ |

**शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीः** सन २०१८-१९ मध्ये पुर्णकालीन ३२ कंत्राटी पध्दतीचे १० तासीकेप्रमाणे १११ असे एकुण १५३ शिक्षक व ३७ शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत होते.

**ग्रंथालय विभाग :** या महाविद्यालयाचे ग्रंथालय अभ्यासक्रम व इतर ग्रंथानी समृध्द असुन दरवर्षी यामध्ये अद्यावत ग्रंथाची भर पडत आहे. व ते समृध्द होत आहे. ग्रंथालयात प्रमुख विषयावरिल मासीके नियतकालीके विकत घेण्यात येतात. व ती प्राध्यापकांना तसेच विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिली जातात. ग्रंथालयात ३१ मार्च २०१८ रोजी रु. ५१.७३.८८०/- ची एकुण ३५६४५/- पुस्तके उपलब्ध होती. यानंतर १ एप्रील २०१८ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीत रु. १७७८०२/- ची एकुण १०६० पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत. ३१ मार्च २०१९ रोजी रु. ५३,५१,६८२/- किंमतीची एकुण पुस्तके ३६७०५ गंथालयात उपलब्ध आहेत.

तसेच ३१ मार्च २०१८ रोजी मासीके व नियतकालीकांची संख्या एकुण ४५२ आहेत.त्यांची किंमत रु. १,८२,४८० /- एवढी आहे. यानंतर १ एप्रील २०१८ ते ३१ मार्च २०१९ या कालावधीत रु.२०९७० /- किंमतीची एकुण

Scanned by CamScanner

मासीके व नियतकालीके उपलब्ध केलेली आहे.३१ मार्च २०१९ रोजी रु. २,०१,८३५/-चे एकुण ४७५ मासीके व नियतकालीके आहेत. ग्रंथालयात अभ्यासक्रमा व्यतीरीक्त स्पर्धापरिक्षा, नेट-सेट,नोकरी संदर्भ, व्यक्तिमत्व विकासाबाबत विविध पुस्तके व मासीके विद्यार्थ्यांना देण्यात येते तसेच ग्रंथालयशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशीप प्रशिक्षण देण्यात आलेले आहेत/येत आहे.दररोज १५० पेक्षा जास्त विद्यार्थी ग्रंथालयाचा लाभ घेत आहे. ग्रंथालयात १३ संगणक, १३५CDs DVDs आहेत. जर्नल्स व मासीके याप्रमाणे आहेत. Pramana,Journal of Physics, Jr. of Asia Democracy & Development, Current Science, Proceeding of Mathematical Science, University News, Everyments Science, 8 Indian Journals of Computer Science, Indian Journal of Management, Electronics for you, Food Technology Abstract, Food Digest, Dream 2047, Employment News, Shivsanstha, Indian Today, Competition Affair, शिक्षण संक्रमण, अक्षरवैदर्भी इत्यादी. तसेच ग्रंथालयात वृत्तपत्र व साप्ताहीक पुढिलप्रमाणे उपलब्ध आहेत. लोकमत,तरुणभारत,लोकसत्ता,दैनिक भास्कर, देशोन्नती,नवभारत,मातृभुमी, रोजगार नोकरी संदर्भ साप्ताहीक, सोमेश्वर नोकरी संदर्भ साप्ताहीक, हिंदुस्थान,प्रतिदीन, दैनिक सकाळ, नवभारत, वृत्तकेसरी, दी हीतवाद न्युज, इंडीयन एक्सप्रेस इत्यादी. ग्रंथालयात पुढिल प्रमाणे योयी सुविधा आहेत. १. ग्रंथालयातील वाचन कक्षात विद्यार्थ्यांना अभ्यासा करिता बसण्याची व्यवस्था असून १० संगणकावर हायस्पीड इंटरनेटची सुविधा करण्यात आलेली आहे. २. ओपन ॲक्सेस. ३. अत्याधुनिक सोयीनी उपयुक्त वाचनकक्ष. ४. ग्रंथालयाची स्वतंत्र बेबसाईट www.mfmlibrary.blogspot.mom असुन ग्रंथालया बाबत सर्व माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे. ५. Online E-Books. Free Download/Iinflibnet, National Digital Library. ६. ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करणा-या विद्यार्थ्याला बेस्ट युजर अवार्ड देण्यात येत आहे. ७. विद्यार्थ्यांना मागील पाच वर्षात झालेल्या विद्यापीठ परीक्षा प्रश्नपत्रिका संच उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ८. माजी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची सुविधा देण्यात येते. ९. डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंती निमीत्त ग्रंथप्रदर्शनीचे आयोजन करण्यात येतात. १०. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमीत्त वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात येतात. ११. विद्यार्थ्यांकरिता वाचन कक्षात ऑनलाईन व्याख्यानाकरिता एलइडी लावण्यात आलेले असुन त्यांना ऑनलाईन व्याख्यान दाखविण्यात येतात.१२. पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना एका वेळेस तीन पुस्तके ग्रंथालयातुन उपलब्ध करुन देण्यात येतात.

**खेड व किडा विभाग :** शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये शारिरीक शिक्षण विभागातर्फे सं.गा.बा अमरावती विद्यापीठ,अमरावती अंतर्गत आयोजीत विविध आंतरमहाविद्यालयीन खेळ व स्पर्धामध्ये सहभाग घेतला. यामध्ये व्हॉलीबॉल, खोखो,कबड्डी, मैदानी स्पर्धा, क्रासकंट्री, तायकांडो, बॉक्सींग इत्यादी खेळात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कु. प्रणाली जी. सुंदरकर, बी.ए.भाग.३ ही विद्यार्थीनी वेटलीप्टींग व पॉवर लिफ्टींग या स्पर्धेत आंतर महाविद्यालयीन स्पर्धामध्ये सुवर्ण पदक घेवून आंतर विद्यापीठीय वेटलीप्टींग या स्तरावर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतीनिधीत्व केलेले आहे. या करिता विद्यापीठ तर्फे कलर कोट देवून तीचा गौरव करण्यात आला ही गोष्ट महाविद्यालयाच्या दृष्टिने गौरवाची आहे. तसेच कु. किरण नागले, बी.ए.भाग २ या विद्यार्थीनीने वेटलीप्टींग या स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले.

महाविद्यालयाचा विद्यार्थी वृषभ आर तीवस्कर, बी.ए.भाग १ याने मैदानी स्पर्धा पाच व दहा की.मी.धावणे या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केले. या विद्यार्थ्याची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने अश्वमेघ या स्पर्धेत निवड केली व त्याने विद्यापीठाचे प्रतीनिधीत्व केले.

कु.कश्यप एल.साने, बी.ए.भाग १ या विद्यार्थीनीने आंतर महाविद्यालयीन तायकांडो या स्पर्धेत कास्यपदक प्राप्त केले ही सुध्दा अभिमानास्पद गोष्ट आहे.या सर्वाचे महाविद्यालयातर्फे अभिनंदन करण्यात आले.

**राष्ट्रीय सेवा योजना :**

राष्ट्रीय सेवा योजना पथक,एन.सी.सी.विभाग तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वैदकिय महाविद्यालय व रुग्नालय रक्तपेढी यांच्या सयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे दि.३०/८/२०१८ ला रक्तदान शिबीराचे आयोजन प्राणिशास्त्र विभागात करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.डी.वडते, प्रमुख अतीथी डॉ.अडतीय, डॉ.यु.ई.चौधरी यांच्या हस्ते डॉ.पंजाबराव

Scanned by CamScanner

उपाध्ये भाऊसाहेब देशमुख, संत गाडगे बाबा यांच्या प्रतीमेला हारार्पण करुन रक्तदान शिबीराला सुरवात झाली. रक्तदान शिबीरात महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक,एनसीसी पथक मीळून ४० पीशव्या रक्त डॉ.पंजाबराव देशमुख रक्तपेढीला गोळा करुन देण्यात आले.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाने दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत विशेष मोहीमे अंतर्गत महाविद्यालय परिसर, वस्तीगृह या ठीकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छ पंधरवाडा आयोजना करिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.डी.वडते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.उमेश सांगोळकर, डॉ.मंगेश बोबडे, प्राध्यापीका सौ.माधुरी उमेकर, डॉ.सौ.शोभा रत्नपारखी यांनी विशेष परीश्रम घेतले.

राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे उदघाटन दि. ७ ऑगस्ट २०१८ ला महाविद्यालयाच्या डॉ.पंजाबराव उपाध्ये भाऊसाहेब देशमुख सभागृहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.डी.वडते, प्रमुख वक्ते डॉ.राजेश मीरगे, कार्यक्रम अधिकारी डॉ.उमेश सांगोळकर,डॉ.मंगेश बोबडे,प्रा.सौ.माधुरी उमेकर उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजना पथक,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी महाराष्ट्र शासनाच्या दि. १ जूलै ते ७ जूलै दरम्यान लावण्यात येणा-या वृक्षलागवडीच्या वनमहोत्सव कार्यक्रमात मोठया उत्साहाने सहभाग घेतला. रासेयो, एनसीसी. कीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिवस २१ जून रोजी साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करतांना योग द्वारे आध्यात्मीक उन्नती साधता येते. तसेच भारतीय संस्कृतीतील योगाचे महत्व अधोरेखित होण्याचे प्रयत्न या दिवसाच्या निमीत्ताने होते असे मत यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस कार्यक्रम आयोजीत करण्यात आला असता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जे.डी.वडते, प्रमुख वक्ते म्हणून रासेयो क्षेत्रीय समन्वयक डॉ.पी.सी.ढोले तर प्रमुख अतीथी नॅक समन्वयक डॉ.ओ.एस.देशमुख, कार्यक्रम अधिकारी डॉ.उमेंद्र सांगोळकर, डॉ.मंगेश बोबडे,प्रा.माधुरी उमेकर, डॉ. सौ.शोभा रत्नपारखी, रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी निशांत येवले उपस्थित होते.

**राष्ट्रीय छात्र सेना :** शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये कॅडेट्स ५५ प्रवेशित होते. ८ महाराष्ट्र बटालीयन एन.सी.सी.अमरावती अंतर्गत घेण्यात आलेल्या सर्व प्रशिक्षण शिबीरामध्ये सर्व छात्र सहभागी झाले होते. थलसेना शिबीराकरिता कॅडेड दिपेश्वर वाडीवे, कु.मयुरी लाड , कु.गीता कोकोटे यांची निवड झाली. अमरावती येथे संपन्न झालेल्या पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचालनकरिता कॅडेड गौरव यावले यांची निवड झाली. पथकातील कॅडेड पारितोश कडू, भुषण गोहत्रे व रीतेश सोनुले यांची सेना दलात निवड झालेली आहे. एन.सी.सी.मधील कॅडेडनी वृक्षारोपन, रक्तदान शिबीर, पल्स पोलीओ, स्वच्छता अभियान, मतदान जागृती, रस्ता सुरक्षा इ. मध्ये उस्फूर्त सहभाग नोंदविला. तसेच महत्वाच्या विवीध अभियानामध्ये सहभाग नोंदवून कॅडेटस देशसेवा, त्याग व समर्पित भावनांचा परिचय देत आहेत.

**सांस्कृतीक कार्यक्रम** :संत गाडगे बाबाअमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला येथे युवा महोत्सव दिनांक २६ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर २०१८ या कालावधीत आयोजीत करण्यात आला होता. या युवा महोत्सव कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभाग घेतलेला होता.यामध्ये लोकनृत्य, लोकगीत, वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, स्कीट, माईम, एकांकीका इत्यादी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेचे चमु व्यवस्थापक म्हणून डॉ.सी.डी.पाखरे यांनी उत्कृष्ठ जबाबदारी पार पाडलेली होती. तसेच संचालक,शारिरीक शिक्षण विभाग यांनी सुध्दा उत्तम प्रकारे सहकार्य केले.युवा महोत्सवात विद्यार्थ्यांची कामगीरी उत्कृष्ठ अशी राहली. महाविद्यालयात डॉ. पंजाबराव उपाध्ये भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंती उत्सवानिमीत्त आयोजीत करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थी चमूने लोकगीत व लोकनृत्य कार्यक्रमाचे उत्कृष्ठ असे आयोजन व सादरीकरण केले. तसेच स्वागत गीत व इतर समयोचीत गीते सादर केली.

Scanned by CamScanner

**विद्यापीठ परिक्षा निकाल :**

| अ. क्र | वर्ग | सन २०१८-१९ च्या परिक्षेचा निकाल | | |
|---|---|---|---|---|
| | | परिक्षेला बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी | निकालाची टक्केवारी |
| १ | प्रथम वर्ष कला सेमी.१ | ३२८ | ७६ | २३.१७ |
| २ | प्रथम वर्ष कला सेमी.२ | २९१ | ४८ | १६.४९ |
| ३ | द्वितीय वर्ष कला सेमी.३ | १९१ | ४२ | २१.९९ |
| ४ | द्वितीय वर्ष कला सेमी.४ | १७९ | ५६ | ३१.२८ |
| ५ | तृतीय वर्ष कला | १७४ | ६२ | ३५.६३ |
| ६ | प्रथम वर्ष वाणिज्य(मराठी/इंग्रजी माध्यम)सेमी.१ | ३०५ | १२० | ३९.३४ |
| ७ | प्रथम वर्ष वाणिज्य(मराठी/इंग्रजी माध्यम)सेमी.२ | २८५ | ९६ | ३३.६८ |
| ८ | द्वितीय वर्ष वाणिज्य(मराठी/इंग्रजी माध्यम)सेमी.३ | २५१ | १२५ | ४९.८० |
| ९ | द्वितीय वर्ष वाणिज्य(मराठी/इंग्रजी माध्यम)सेमी.४ | २४४ | ११२ | ४५.९० |
| १० | तृतीय वर्ष वाणिज्य(मराठी/इंग्रजी माध्यम) | २९२ | १८६ | ६३.७० |
| ११ | प्रथम वर्ष विज्ञान सेमी.१ | २६४ | १२१ | ४५.८३ |
| १२ | प्रथम वर्ष विज्ञान सेमी.२ | २४७ | १३९ | ५६.२८ |
| १३ | द्वितीय वर्ष विज्ञान सेमी ३ | २३३ | ११९ | ५१.०७ |
| १४ | द्वितीय वर्ष विज्ञान सेमी ४ | २३० | १३८ | ६०.०० |
| १५ | तृतीय वर्ष विज्ञान सेमी ५ | २३८ | १५६ | ६५.५५ |
| १६ | तृतीय वर्ष विज्ञान सेमी ६ | २३८ | १७५ | ७३.५३ |
| १७ | एम.ए.भाग १ अर्थशास्त्र सेमी.१ | ५१ | १० | १९.६१ |
| १८ | एम.ए.भाग १ अर्थशास्त्र सेमी.२ | ४५ | ८ | १७.७८ |
| १९ | एम.ए.भाग २ अर्थशास्त्र सेमी.३ | ४८ | ३२ | ६६.६७ |
| २० | एम.ए.भाग २ अर्थशास्त्र सेमी.४ | ४४ | २२ | ५०.०० |
| २१ | एम.ए.भाग १ (मराठी) सेमी.१ | ३७ | १८ | ४८.६५ |
| २२ | एम.ए.भाग १ (मराठी) सेमी. २ | २६ | २२ | ८४.६२ |
| २३ | एम.ए.भाग २ (मराठी) सेमी. ३ | १५ | १२ | ८०.०० |
| २४ | एम.ए.भाग २ (मराठी) सेमी. ४ | ११ | ०७ | ६३.६४ |
| २५ | एम.ए.भाग १ (इंग्रजी)सेमी.१ | १९ | ०१ | ०५.२६ |
| २६ | एम.ए.भाग १ (इंग्रजी)सेमी.२ | १६ | ०२ | १२.५० |
| २७ | एम.ए.भाग २ (इंग्रजी )सेमी.३ | १३ | ०४ | ३०.७७ |
| २८ | एम.ए.भाग २ (इंग्रजी ) सेमी.४ | १० | ०२ | २०.०० |
| २९ | एम.कॉम भाग १ इंग्रजी सेमी. १ | ९५ | ४७ | ४९.४७ |
| ३० | एम.कॉम भाग १ इंग्रजी सेमी. २ | ८९ | ४५ | ५०.५६ |
| ३१ | एम.कॉम भाग २ इंग्रजी सेमी. ३ | ६९ | ५० | ७२.४६ |
| ३२ | एम.कॉम भाग २ इंग्रजी सेमी. ४ | ६५ | ५८ | ८९.२३ |
| ३३ | एम.एस्सी भाग १ रसायनशास्त्र सेमी १ | २२ | १६ | ७२.७३ |
| ३४ | एम.एस्सी भाग १ रसायनशास्त्र सेमी २ | २२ | ०८ | ३६.३६ |
| ३५ | एम.एस्सी भाग २ रसायनशास्त्र सेमी ३ | २१ | ०५ | २३.८१ |
| ३६ | एम.एस्सी भाग २ रसायनशास्त्र सेमी ४ | २० | १४ | ७०.०० |
| ३७ | एम.ए.भाग १ (राज्यशास्त्र) सेमी.१ | २० | १६ | ८०.०० |
| ३८ | एम.ए.भाग १ (राज्यशास्त्र) सेमी.२ | २८ | १६ | ५७.१४ |
| ३९ | एम.ए.भाग २ (राज्यशास्त्र) सेमी.३ | २७ | १३ | ४८.१५ |
| ४० | एम.ए.भाग २ (राज्यशास्त्र) सेमी.४ | २३ | १५ | ६५.२२ |
| ४१ | एम.एस्सी भाग १ संगणकशास्त्र सेमी.१ | १९ | ०७ | ३६.८४ |
| ४२ | एम.एस्सी भाग १ संगणकशास्त्र सेमी.२ | १९ | १४ | ७३.६८ |
| ४३ | एम.एस्सी भाग २ संगणकशास्त्र सेमी.३ | १९ | १४ | ७३.६८ |

Scanned by CamScanner

५३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४४ | एम.एस्सी भाग २ संगणकशास्त्र सेमी.४ | १९ | १२ | ६३.१६ |

**मान्यवरांच्या भेटी :** सन २०१८-१९ मध्ये महात्मा फुले व्याख्यानमाला अंतर्गत श्री कोमल ठाकरे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. स्व. माजी प्राचार्य पी.डी.चौधरी स्मृतीव्याख्यानमाला अंतर्गत प्रा.श्री सतीश तराळ यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. तसेच स्व.सीतारामजी चौधरी स्मृतीव्याख्यानमाला अंतर्गत प्रा.श्री निलेश रावसाहेब जळमकर, लेखक व चित्रपट दिग्दर्शक यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. तसेच महाविद्यालयातील विविध कार्यक्रमाला मा.श्री डॉ.कोमल ठाकरे, नागपुर, मा.श्री धनराज वंजारी, मुबंई, मा.डॉ.विजय ठाकरे, मा.डॉ.सुनिल डोंगरे,मा.डॉ.आशिष लोहे,मा.श्री विक्रम ठाकरे, मा.श्री हर्षवर्धनजी देशमुख, अध्यक्ष ,श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, मा.श्री नरेशचंद्रजी पं.ठाकरे, उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, मा.श्री शेषरावजी खाडे, सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती, तसेच मा.प्रा.अशोकराव घोरमाडे, मा.श्री दौलतरावजी तरार, मा.श्री अरविंद्रजी शेळके, मा.प्रा.टी.व्हि.व-हेकर, मा.श्री गजाननराव चौधरी, मा.श्री जगदीशजी काळे, मा.श्री राजेंद्रजी सावरकर, सौ.रेखाताई सावरकर, मा.श्री दिपक वानखडे, पोलीस निरीक्षक, वरुड तसेच वरुड शहरातील व परीसरातील मान्यवरांनी या महाविद्यालयाला भेटी दिलेल्या आहे.

(डॉ.जे.डी.वडते)
प्राचार्य/ सचिव
महाविद्यालय विकास समिती,
महात्मा फुले कला,वाणिज्य व सीतारामजी
चौधरी विज्ञान महाविद्यालय,वरुड.जि.अमरावती.

Scanned by CamScanner